५

# इयत्ता आठवीच्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाचा विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता विकास दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास

प्रा. सौ. प्रियांका प्रफुल्ल सुभेदार
सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड.

**प्रस्तावना:**

अनेक शिक्षणतज्ञांनी कृतीव्दारा अध्ययनावर भर दिलेला आहे. त्याचप्रमाणे जागतिक शिक्षण आयोगाने शिक्षणाचे जे चार स्तभ सांगितले आहेत. त्यापैकी एक स्तंभ म्हणजे कृतिशीलतेसाठी अध्ययन विद्यार्थ्यनि केलेल्या अध्ययनाचा वापर प्रत्यक्ष सरावामध्ये कसा करावा आणि विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये जे व्यावसायिक काम करावयाचे आहे त्यासाठी शिक्षण कसे असावे या प्रश्नांची उत्तरे या स्तंभाशी निगडीत आहेत. मात्र ही कृतिशीलता ज्ञानावर आधारित उद्योग व सेवाक्षेत्रे याच्याशी संबंधित आहेत.

उद्योजकता शिक्षणाची गरज सध्याच्या काळात पूर्वीपेक्षा अधिक निर्माण झाली आहे. शालेय विषयातून उद्योजकतेचा विकास विद्यार्थ्यामध्ये करता येईल. विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता विकास करण्यासाठी सध्याच्या सामान्यविज्ञान पाठयपुस्तकांचा आशय उपयुक्त आहे का हे अभ्यासण्यासाठी संशोधकाने इ. ८ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

**संशोधनाची गरज :-**

आपल्या देशात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात गळतीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे एखादा विद्यार्थी स्थगन व गळती यामुळे शाळा सोडून गेल्यास त्याच्याकडे व्यावसायिक शिक्षण नसते. पूर्वीच्या काळात वंशपरंपरागत व्यवसाय केले जात असत. परंतु सध्याच्या काळात वंशपरंपरागत व्यवसायात मुलांना गोडी वाटत नाही. त्यांना वेगळा व्यवसाय, नोकरी करायला आवडते. तसेच नोकरीची क्षेत्रेही मर्यादित आहेत व सुशिक्षितांची संख्या अधिक आहे. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी सगळयांना नोकरी उपलब्ध होऊ शकत नाही. अनेक जणांना दूरवर नोकरीसाठी जायचे नसते. अशा उमेदवारांना घराच्या जवळपास व्यवसाय सुरु करता येतो. त्यामुळे सुशिक्षित बेकारांची समस्या कमी होण्यास मदत होईल. शालेय शिक्षणातून उद्योजकते विषयी ज्ञान देणे व उद्योजकते संबंधीचा सुयोग्य दृष्टिकोन निमार्ण करण्याचे काम प्रभावीपणे झाले तर छोटे मोठे उद्योजक तयार होतील व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल.

**उद्योजकता शिक्षणाची व्याख्या :-** एखादा उद्योग कोठे सुरु करावा, त्यासाठी पैसा कसा उभारावा कच्चा माल कोठून मिळवावा, कामगारांची जमवाजमव कशी करावी, नवीन तंत्रज्ञानाचा कोठे कोठे वापर करावा ते तंत्रज्ञान कसे विकसित करावेयाचे दिले जाणारे शिक्षण म्हणजेच उद्योजकता शिक्षण होय. शालेय अभ्यासक्रमातून उद्योजकता शिक्षण हे दोन प्रकारे देता येईल. कार्यानुभव हया विषयाच्या अंतर्गत काही विषयांचा समावेश करता येईल. तसेच शालेय विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्याची मानसिक तयारी करुन घेणे, उद्योजकतेचे संस्कार करणे, पाठयपुस्तकातीलल्ल आशयाचा अर्थ स्पष्ट करुन त्यासंबंधी व्यवसाय कसा तयार करता येईल याची दृष्टी विद्यार्थ्याला देणेयामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. आजच्या शालेय शिक्षणामध्ये पाठयपुस्तक हे एक प्रभावी साधन म्हणून मानले जाते. पाठयपुस्तकाला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे सध्याच्या इ. ८ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाचा आशय विद्यार्थ्यामधील उद्योजकता विकासासाठी परिणामकारक आहे का हयाचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**समस्या विधान :** इ. ८ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाच्या आशयाचा विद्यार्थ्यामध्ये उद्योजकतेचा विकास' हया दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास करणे.



Vol:2nd, Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June 2013,ISSN : 2319-5525

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

**१) सन २००४ च्या प्राथमिक स्तरावरील सामान्य विज्ञानाच्या इ. ८ वी च्या पाठ्यपुस्तकातील आशय विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास करण्यासाठी योग्य आहे का याचा अभ्यास करणे.**

**२) इ. ८ वी च्या विज्ञान पाठ्यपुस्तकातील कोणता आशय विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकासासाठी उपयुक्त आहे याचा शोध घेणे.**

**३) विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकासासाठीचे उपक्रम सूचित करणे.**

**४) विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकासासाठीचे अध्ययन प्रसंग सूचित करणे.**

**गृहितके :-**

**१) अभ्यासक्रमाचे हेतू साध्य करण्याचे पाठ्य पुस्तक हे एक साधन आहे.**

**२) साधारणपणे पाठ्यपुस्तक हे अभ्यासक्रमातील उद्दिष्टांचा विचार करुन तयार केलेलेअसते.**

**संशोधनाची व्याप्ती :-**

**१) प्रस्तुत संशोधनामध्ये केवळ इ. ८ वी च्या सामान्य विज्ञान पाठ्यपुस्तकाचा विचार केलेला आहे.**

**२) प्रस्तुत संशोधना मध्ये इ. ८ वी च्या सामान्य विज्ञान पाठ्यपुस्तकाचा विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास हया दृष्टिकोनातून विचार केलेला आहे.**

**मर्यादा :-**

**१) प्रस्तुत संशोधन प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ नुसार महाराष्ट्रातील इ. ८ वी च्या सामान्य विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित आहे.**

**२) प्रस्तुत संशोधन इ. ८ वी च्या सामान्य विज्ञान पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास हया पुरते मर्यादित आहे.**

**संशोधन पद्धती :**

**प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती व आशय विश्लेषण तंत्राचा वापर केलेला आहे.**

**संशोधनाची साधने:- संशोधनासाठी पडताळा सूची व मतावली हया दोन साधनांचा वापर करण्यात आला.**

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

प्रस्तुत संशोधनात पाठयपुस्तकातील प्रत्येक पाठातील आशयाचे विश्लेषण करण्यात आले. त्यासाठी पडताळा सूचीचा वापर करण्यात आला. तसेच मतावलीच्या आधारे माहिती संकलन करण्यात आले. त्यानुसार मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढण्यात आले.

**निरीक्षणे व निष्कर्ष :-**

इ. ८ वी च्या विज्ञान पाठयपुस्तकामधील आशय विद्यार्थ्यांच्यामध्येउद्योजकता विकास करण्यासाठी उपयुक्त आहे. उदा:-

१) उर्जेचेस्त्रोत हयामध्ये सौर कुकर, सौरजलतापक तयार करणे हयाविषयी माहिती दिलेली आहे. सौर कुकर, सौरजलतापक तयार करणे, त्याची विक्री करणे हयाची माहिती मिळविणे व त्यावर आधारीत व्यवसाय करता येईल हयाची जाणीव शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये करता येईल.

२) पशुसंगोपन हया धडयामध्ये मेंढीपालन, कुक्कुटपालन, मोती उदयोग, लाख उदयोग, रेशीम किडयांची पैदास, मस्योत्पादन हया व्यवसायांची माहिती दिलेली आहे.

हया व्यवसायांसंबंधी जाणीव विद्यार्थ्यांमध्ये करण्यासाठी खालील गोष्टी शिक्षकांना करता येतील. मेंढीपासून मिळणारी लोकर, त्याची किंमत, त्यापासून होणारा फायदा हया विषयी अधिकची माहिती सांगणे. कुक्कुटपालनासाठीचा खर्च, फायदा इ. विषयी माहिती विद्यार्थ्यांना मिळवायला सांगणे. मोत्याचे दागिने तयार करण्याचे प्रशिक्षण अनेक ठिकाणी दिले जाते. हयाविषयी जाणीव जागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे. लाख उदयोग, रेशमी किडयांची पैदास हया उदयोंगाविषयी अधिक माहिती विद्यार्थ्यांना सांगता येईल.

३)इ. ८ वी च्या सामान्य विज्ञानाच्या पाठयपुस्तकातील काही उपक्रम / कृती अशा आहेत की त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकते विषयीची जाणिव निर्माण होईल. उदा. बेकरी उत्पादनांतील घटकांची माहिती मिळविणे, अत्तर कसे तयार केले जाते हयाची माहिती मिळविणे.

संदर्भ :-
१) प्रा. प्र. ल. गावकर, डॉ. संगिता शिरोडे :- वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह, नूतन प्रकाशन पुणे.
२) डॉ. निलीमा सप्रे, डॉ. प्रीती पाटील, डॉ. ज्योती पाटील :- गतिमान शिक्षणासाठी विचारप्रवाह, फडके प्रकाशन कोल्हापूर.
३) इ. ८ वी चेविज्ञान पाठ्यपुस्तक:- महाराष्ट्रराज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ पुणे.
४) मुळे, उमाठे (१९९८): शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या बुक्स, औरंगाबाद.

• • •

• • • • • •